MHSN090000892021

# <u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली</u>

(पीठासिन अधिकरी श्री. किरण रा. खोंद्रे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक २५/२०२१.**
**निशाणी क्रमांक २४ खालील आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. प्रशांत संपतराव गावडे. | **वादी.** |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | श्री.धनाजी रंगराव यादव. | **प्रतिवादी.** |

**(०१).** वादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ०६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीकरणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादीचे विरुध्द निरंतर मनाईकरीता व हुकमी ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन की, दावा दाखल करीत असताना दावा कलम १ ब मध्ये वादी यांनी "सोबत कच्चा हातनकाशा" जोडलेबाबतचे कथन केले आहे. मात्र नजरचुकीने सदरचा हातनकाशा जोडण्याचे राहुन गेलेले आहे. सदरचा हातनकाशा या कामी समजुतीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा हातनकाशा दाव्यासोबत जोडून दावा दुरुस्ती करीता प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे.

**(०२).** प्रतिवादी यांनी निशाणी क्रमांक २८ येथे त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांचे कथन असे की,

त्यांनी या कामी हजर होवुन निशाणी २१ कडे त्यांचे कैफियत व म्हणणे दिलेले असुन त्यातील परिच्छेद क्र.०६ मध्ये वादीने दावा कलम १ ब या सोबत कच्चा हातनकाशा जोडला नसलेबाबतची तक्रार उपस्थित करुन वादीचा दावा व निशाणी क्र.०५ कडील ताकिद अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ चा मुख्य हेतू हा दाव्यातील कथनांची दुरुस्ती (Amendmen of Pleadings) असा आहे. वादी दाव्यामध्ये कोणतीही दुरुस्ती मागत नसुन दावेसोबतचा कच्चा हातनकाशा जोडण्याकरीता दुरुस्ती मागत आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**(०३).** वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निर्णीत करणेहेतु माझे समोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यांचे सकारण स्पष्टीकरण व कारणमिमांसा मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलते काय ? | **नाही.** |
| ०२. | उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **होय.** |
| ०३. | खटल्यांची अनावश्यक गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **होय.** |
| ०४. | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करणेत आला.** |

## कारणमिमांसा.

## वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करिता.

(०४). सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेहेतु एकत्रीत विचारात घेतले आहेत. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कबुल तथ्यानुसार वादीने हा दावा निरंतर मनाईकरीता व हुकमी ताकिदीकरीता दाखल केला आहे. वादीने दावा कलम ०१–ब मध्ये दाव्या सोबत कच्चा हात नकाशा जोडला असुन तो या दाव्याचा भाग समजावा असे कथन केले आहे. असे असले तरी दाव्या सोबत तसा हातनकाशा जोडलेला नाही. प्रतिवादींची मुख्य तक्रार अशी आहे की, वादी मुळ दाव्यात कोणतीही दुरुस्ती मागत नाहीत सबब दि.प्र.सं. आदेश ०६ नियम १७ येथे लागु पडत नाही. दाव्यासोबत जोडलेला हातनकाशा हा दाव्याचाच भाग समजला जातो व तो हुकुमनाम्याचा देखील भाग होतो. जर नजरचुकीने दाव्या सोबत हातनकाशा जोडला नसेल तर त्या बाबत मागितलेली दुरूस्ती ही दाव्याचीच दुरूस्ती मानावे लागणार आहे. प्रस्तावित दुरूस्ती मंजुर केल्याने म्हणजेच केवळ दाव्यासोबत हातकाशा जोडणेस परवानगी दिल्याने दाव्याचे स्वरूप नक्कीच बदलत नाही, उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे आणी खटल्यांची अनावश्यक गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे असे माझे मत आहे. याचे कारण असे आहे की, प्रस्तावित दुरूस्ती नामंजुर केलेस वादीस याच मिळकती करिता, याच प्रतिवादीं विरूध्द आणी याच न्यायालयात नव्याने दावा दाखल करावा

लागणार आहे, की जे हा अर्ज मंजुर करून टाळता येणारे आहे. तसेच प्रतिवादींना होणारा त्रास हा द्रव्यदंडावर भरून दिला जाऊ शकतो व प्रतिवादींना त्यांची ज्यादा कैफियत दाखल करणेचा अधिकार आहेच.

(०५). या सर्व तथ्यांचा विचार करता मी **वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ होकारार्थी** ऊत्तरी करून, वादीचा अर्ज गुणदोषावर मंजुर होत असलेने मी त्यांनी आधार घेतलेल्या वादप्रश्न क्रमांक ०४ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**०१.** निशाणी क्रमांक २४ वरील अर्ज रक्कम रूपये २५०/- चे द्रव्यदंडावर मंजुर करण्यात येतो.

**०२.** द्रव्यदंड प्रतिवादींना दिलेशिवाय या आदेशाचा अंमल होणार नाही.

**०३.** अर्जाचा खर्च वादीवर राहील.

KIRAN RAJARAM KHONDRE

Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2022.04.29 17:45:35 +0530

**तासगांव.**
दिनांक : २८ एप्रिल २०२२.

(किरण रा. खोंद्रे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव,
जिल्हा सांगली.

दिनांक – २९ एप्रिल २०२१.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – २९ एप्रिल २०२१.

आदेश अपलोड दिनांक – २९ एप्रिल २०२१.